Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0016

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# राजर्षी शाहू महाराजाची सामाजिक समता: एक अध्ययन

**प्रा. डॉ. सिध्दार्थ शिवाजी वाठोरे**
कला व विज्ञान महाविद्यालय कामरगाव
ता. कारंजा लाड जि. वाशिम

**सारांश** . महाराष्ट्राच्या प्रबोधन कालखंडामध्ये सामाजिक समतेचा विचारमांडणारे थोर समाजसुधारक म्हणून राजर्षी शाहू महाराजांचा अल्लेख केला जातो. भारताची सामाजिक व्यवस्था वर्णव्यवस्थेवर आधारीत आहे. या व्यवस्थेत ब्राम्हण क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे चार वर्ण तसेच अतिशुद्र असा अलिखीत वर्ण आहे. या वर्ण व्यवस्थेत ब्राम्हण, क्षत्रिय वैश्य या वर्णास खुप जास्त अधिकार प्राप्त झाले आहेत. तसेच शुद्र व अतिशुद्र या वर्णास अधिकारापासूनवंचित ठेवण्यात आले आहे. सोबतच या व्यवस्थेत जातीव्यवस्थाही विद्यमान असल्यामुळे समाज गटागटात विभागला आहे. त्यामुळे ही व्यवस्था विषमतावादी व बहुसंख्य लोकांचे अधिकार नाकारणारी व्यवस्था ठरते या व्यवस्थेत बहुसंख्य लोकांचे शोषण होते. भारतीय समाजाची निर्मीती समाताधिष्ठित व्यवस्थेवर करायची असेल तर ही व्यवस्था पुर्णपणे बदलली पाहीजे. तिचा धिक्कार केला पाहीजे असा मुलभूत विचार राजर्षी शाहू महाराजांनी मांडला आले. त्यांच्या समताधिष्ठित नवसमाजाची संकल्पना कशी आहे त्यांच्या मधील या विचाराविषयी असलेली समानता दर्शविण्याचा उद्देश प्रस्तुत शांध निबंधातून करण्यात आला आहे.

मुख्य शब्द - राजर्षी शाहू महाराज, समाज, समता, अध्ययन

राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ ला लक्ष्मी विलास पॅलस, बारडा, कोल्हापूर या ठिकाणी झाला शाहू महाराजाचे मुळ नाव यशवंत होते. त्यांच्या पित्याचे नाव जसयिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे तर मातेचे नाव राधाबाईसाहेब होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौघे शिवाजी महाराज यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नी आनंदाबाई यांनी यशवंतरावांना दत्तक घेतल. १ एप्रिल १८९१ रोजी बडोदा येथील गुणाजी खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाईशी विवाह झाला. यांचा राज्यभिषेक २ एप्रिल १८९४ ला झाला. महाराजांचे प्रशिक्षण राजकोट येथील संस्थानिकांच्या मुलासाठी असलेल्या विद्यालयात झाले. त्यांच्यावर फ्रेझर या गुरूच्या शिक्षणाचा प्रभाव पडला. उक्ती प्रमाणे कृती करणारा राजा म्हणून शाहू महाराजांनी आपली ओळख निर्माण केली होती त्यांनी आपल्या २८ वर्षाच्या राज्यकारभारचा कारकिर्दीत अनेक ऐतिहासिक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. त्यांनी समाजात असलेली विषमता दुर करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या क्रांतीकारी निर्णयामुळे त्यांची ओळख समाजसुधारक तथा विचारवंतामध्ये केली जाते. त्यांनी घेतलेल्या सामाजिक समतेचा महत्वपूर्ण निर्णयाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

## १) सामाजिक समता :—

इ.स. १९२० साली शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याला पूरक अनेक महत्वाचे निर्णय घेतले. त्यापैकी पैकी पहिला निर्णय जूनमध्ये त्यांनी राजवाड्यातील देवदेवतांच्या व पुर्वजांच्या समाधीच्या पूजा ज्या ब्राम्हण पुरोहीतांकडून होत होत्या. त्या बंद करून मराठा पुरोहिताकडून सुरू करण्याचा हुकुम दिला महाराज आपल्या हुकुमात म्हणतात. आपल्या देवताची पुजा ब्राम्हणाकडून

घेतली तर त्या देवाना स्पर्श करावयास आम्ही स्वत:च अयोग्य ठरतो. ते आम्हाला काही वेळ क्षत्रिय समाजात तर काही वेळ शुद्र मानतात. यामुळे यापुढे नवीन राजवाड्यात सर्व छत्रांत सर्वपूजा व सोळा संस्कार मराठा पुरोहिताच्याच हस्ते व्हायचे आहेत[१] दुसऱ्या एका हुकुमाने महाराजांनी क्षात्रजगदगुरूंच्या पाटगाव संस्थानातील आणि वाडी रत्नागिरी येथील जोतिबांच्या देवस्थानातील ब्राम्हण पुजाऱ्यांना काढून टाकून त्यांच्या जागी मराठे पुजारी नेमले.[२]

अस्पृश्यता हा मानव समाजाला लागलेला कलंक आहे तो नष्ट करण्यासाठी कृतिशील उपक्रम राबविले त्यातील महत्वाचा उपक्रम म्हणजे गंगाराम कांबळे या अस्पृश्य सदगृहास त्यांनी चहाची हॉटेल टाकण्यासाठी मदत केली. एवढयातच शाहुमहाराज थांबत नाहीत तर त्यांना जाणीव होती की, ज्या समाजाच्या सावलीचा देखील विटाळ मानला जातो त्या समाजाच्या माणसाच्या हॉटेलवर कोणता सवर्ण येणार? म्हणून शाहु महाराज स्वत: आपल्या लवाजम्यासह गंगाराम कांबळेच्या हॉटेलात जातात व तिथे चहापान करतात. शाहू महाराजासारखी मोठी माणसे अस्पृश्य माणसाच्या हातून बनविलेला चहा पितात या बाबींचे अनुकरण तेथील जनतेने केल्यानंतर तेथील अस्पृश्यता कमी होईल.[३] शाहू महाराजांची सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाऊसेस, सरकारी अन्नछत्रे, वगैरे ठिकठिकाणी व नदीचे पाणी पाणवठे, सार्वजनिक विहीरी येथे कोणत्याही मनुष्यप्राण्याचा विटाळा मानायचा नाही म्हणून एक तमाम जनतेसाठी अस्पृश्यता निवारणाचा जाहिरनामा सप्टेंबर १९१९ ला काढला.[४] ज्या समाजाला काडीमात्र किंमत नव्हती. त्या समाजाला समानता प्रास्तापित करण्यासाठी अनेक प्रयत्न शाहू महाराजानी केले.

**शिक्षणात समानता :—**

म. फुले यांनी बहुजन समाजात जागृती निर्माण करण्यासाठी शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न केले. सामाजिक विषमतेचे मुळे अज्ञानात असल्यामुळे त्यांनी शिक्षणाचे कार्य हाती घेतले. त्याच्या निधनांनतर त्यांच्या कार्याला पुढे नेण्यासाठी शाहुमहाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे तसेच मोफत देण्याचा महत्वाचा निर्णय घेतला. शिक्षण हेच मानवी विकासाचे, किंबहुना राष्ट्राच्या सर्व प्रगतीचे अंग आहे. राजर्षी शाहु महाराजांनी नेमके हेच ओळखून बहुजनांना शिक्षण देण्याच्या दृष्टीने मुक्त प्रवाहित शिक्षण योजना आखून १९१३ पासून सक्तीच्या प्राथमिक शिक्षण प्रसाराचा पाया खेड्यात घातला.[५] सोबतच महिला शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी राजपत्र जारी केले. पालक जर आपल्या पाल्यांना शाळेत पाठवत नसतील तर त्यांना एक रूपया दंड आकारण्यात यावा असा आदेशही त्यांनी काढला. शिक्षणासोबतच अस्पृश्यतेचे उच्चाटन होण्यासाठी त्यांनी अस्पृश्य वर्गासाठी वेगळ्या शाळा असे धोरण १९१९ मध्ये बंद केले. सवर्णासोबतच अस्पृश्य समाजातील मुले शिकावी जेणेकरून अस्पृश्यता संपविता येईल असा त्यांचा हेतू होता. त्याचप्रमाणे ६ जुलै १९२० रोजी 'शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा' या नावाची वैदीक शिक्षण देणारी संस्था खानविलकरांच्या अध्यक्षतेखाली अस्तित्वात आली.[६] सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांना शिक्षण मिळावे. या दृष्टीने अस्पृश्य विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीही दिली जावी. शिक्षक कितीही थकलेला असला तरी त्याने अस्पृश्य विद्यार्थ्याला ज्ञान देण्यास तत्पर असले पाहिजे अशा आशयचा आदेश शाहू महाराजांनी दिला.

**आर्थिक समानता :—**

शाहू महाराजांनी आपल्या जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी सामाजिक, आर्थिक शैक्षणिक विकास कशाप्रकारे करावयाचा व आपल्या राज्यात सामाजिक समता कशी निर्माण करायची याविषयचा आर्थिक विचार फार महत्वाचा आहे तो पुढील प्रमाणे महाराजांनी शेतकरी आणि कामकरी यांना जे

मार्गदर्शन केले ते काळाच्या पुढचे होते शेतकऱ्यांना म्हणतात. शेतकऱ्यांनी पिढीजात व जुन्या शेती करण्याच्या पध्दती सोडल्या पाहिजेत व नविन मार्गाचा अवलंब केला पाहिजे. त्यांनी कामगारांना सांगितले मजुर व कारागिर यांनी नवनवीन कसब, तंत्रिक ज्ञान व विज्ञान शिकण्यात पुढे सरसावले पाहिजे. आर्थिक संपन्नता उद्योग करण्यावर अवलंबून आहे. लोकांनी एकत्र येऊन सहकारी कारखाने, सहकारी सोसायट्या व सहकारी मार्केटिंगची व्यवस्था राबविली पाहिजे कोल्हापूर संस्थान त्याकरीता सर्व प्रकारची मदत देण्यास तयार आहे. १९१२—१३ साली सहकारविषयक धोरण आपल्या संस्थानात राबविले.७ शेतकऱ्यांसाठी विविध योजना आखल्या सहाकारी सोसायट्यांची स्थापना करून शेतकऱ्यांना मदत केल्यामुळे शेतकऱ्याची स्थिती सुधारली.

सरकारी तत्वास कायद्याचे स्वरूप देणे आवश्यक होते. त्या उद्देशाने महाराजांनी १९१२ साली आपल्या राज्यात सहकारी संस्थाविषयक कायदा जारी केला. सहकारी संस्थांची कायदेशीर नोंदणी करण्यासाठी सहकार निबंधकाची नेमणुक करण्यात आली. व १९१३ ला कोल्हापुरात ‘दि कोल्हापूर अर्बन को ऑपरेटीव्ह सोसायटी ली.’ ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधवांच्या नेतृवखाली स्थापना झाली. १९२१ सालापर्यंत संस्थानातील सहकारी संस्थाची संख्या ३७ पर्यंत पोहोचली.८ अशा प्रकारे महाराजानी आर्थीक समानता प्रस्थापित करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या व आपल्या राज्यात समानता प्रस्थापित केली.

छत्रपती शाहु महाराजांनी स्वतंत्र, समता आणि बंधुत्व या महान तत्वाचे दर्शन घडवणारे वक्तत्व १६ एप्रिल १९२० रोजी नाशिक येथे निराश्रित सोमवंशीय समाजाच्या जाहीर सभेत ते म्हणाले कोणताही समाज जर शिक्षण संपन्न असेल तरच तो टिकाव धरू शकेल ही गोष्ट तुमच्यातील पुढाऱ्यांना पटली आहे. याचा मला आनंद वाटतो. तुमच्यासारख्या हतभगी व विपन्न जातीला पुढे यावयाचे असेल तर त्याबद्दलचा प्रयत्न तुम्हातील पुढाऱ्यांनीच केला पाहिजे. स्वावलंब ही यशाची किल्ली आहे.९ अशा प्रकारे आपण दिलेल्या मार्गाने जर सर्व सामान्य समाजातील जनता गेली तर सामाजिक समता प्रस्थापित होण्याला वेळ लागणार नाही.

**निष्कर्ष :—**

अशा प्रकारे शाहु महाराजा यांनी फक्त एकाच समाजासाठीच सामाजिक कार्य केले नाही तर त्यांनी बहुजन समाजाला सुध्दा पुढे नेण्यासाठी व सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी सदैव प्रयत्न केले. जर शाहु महाराजांनी म. फुलेंचे हे सामाजिक कार्य करण्याची चळवळ पुढे सुरू ठेवली नसती तर कदाचित बहुजन समाज अशिक्षीत राहीला असता त्यांना स्वांतत्र्य, समता, न्याय, बंधुत्वा या सामाजिक समतेच्या संकल्पनाच कळल्या नसत्या. सामाजातील अस्पृश्यता संपविण्यासाठी तिच्या मूळ कारणाचा शोध घेऊन त्यावर प्रभावी अंमलबजावणी करतात. सर्व सामान्याना समाजात असणारे स्थान महत्वाचे आहे त्यामुळे सर्व सामान्याचे उत्थान म्हणजेच समग्र समाज परिवर्तन होय अशी त्याची ठाम निष्ठा होती. तत्कालीन धर्ममतांना झुगारून समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक समता निर्माण व्हावी या हेतूने राजर्षी शाहू महाराज कायदा निर्माण कयन ती साध्य करण्याचा प्रयत्न करतात. सोबतच समाजाच्या मानसिकतेला आवाहनही करतात. राजर्षी शाहू महाराजांनी समाज परिवर्तनाच्या कार्यास राजाश्रम दिल्यामुळे सामाजिक समतेचे महत्व वाढले व या चळवळीस जन आंदोलनाचे रूपही मिळाले. सामाजिक समता निर्माण व्हावी यासाठी आजही राजर्षी शाहू महाराज याचे विचार प्रेरणादायी ठरतात.

## संदर्भ ग्रंथ सुची

१) राजर्षी शाहु छत्रपती – एक समाज क्रांतीकारक राजा, धनंजय कीर, पहीली आवृत्ती मुंबई १९७९, पृ. क्र. ४५१.
२) राजर्षी एक व्यक्तीदर्शन, श्याम येडेकर, पृ. क्र. १११
३) अनंत राऊत, समाज सुधारकांची तुतारी, कैलाश पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, २००६ पृ. क्र. ८४
४) जयसिंगराव पवार (संपा) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथमावृत्ती, २००१, पृ. क्र. ८२
५) भ. वा. जाधव. राजर्षी श्री शाहू महाराजाची भाषणे, लोक वाड्मय गृह, मे २००९, पृ. क्र. १६९
६) आ. बा. लठ्ठे, श्री म. छत्रपती शाहू महाराज याचे चरित्र – बेळगाव, १९२५
७) दिलीप सुरवाडे (संपा) राजर्षी शाहू महाराज, लोकसाहित्य, प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१० पृ. क्र. ४७
८) जयसिंगराव पवार (संपा) पूर्वीवत पृ. क्र.२०१
९) अनंत राऊत, पुर्वीक्त, पृ. क्र. ८८